# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेस नोट

**2023**

दिनांक १६.०२.२०२३

गुन्हे शाखा, नवी मुंबई

### तळोजा हद्दीमध्ये अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या परदेशी नागरिका विरुद्ध अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली कारवाई
### (अंमली पदार्थ विक्रेत्यांच्या आवळल्या मुसक्या)

..........................................................................................

मा.श्री.मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, मा.संजय माहिते, सह पोलीस आयुक्त, मा.श्री.महेश घुर्ये अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमित काळे पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ सेवन व विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दि. १०/०२/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षास अंमली पदार्थ विक्रीबाबत दोन नायजेरियन इसम एमडी हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याबाबत गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली त्या अनुशंगाने मा.श्री.विनायक वस्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि बासीतअली सय्यद, पोउपनिरी विजय शिंगे, एएसआय सलीम इनामदार, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोहवा/१२०२ कासम पिरजादे, पोहवा/५७८ संतोष गायकवाड, पोहवा/४१८६ राकेश अहिरे, पोना/२८७९ महेंद्र अहिरे यापथकाने मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी पेंधर मेट्रो रेल्वे स्टेशनचे पश्चिमेकडील मेट्रो रेल्वे ट्रॅक ब्रिजचे खाली चौकात पेंधर तळोजा येथे छापा टाकला असता दोन नायजेनियन नागरिक नामे १) नोसोन इगोईजे (NOSON IGHOEIE), वय. ३८ वर्षे, रा. तळोजा, नवी मुंबई. मुळ रा. नायजेरीया देश असे सांगितले. २) चिबुके थाडडेयस इग्वे (CHIBUIKE THADDEUS IGWE ) वय ३५ वर्षे रा. तळोजा, नवी मुंबई मुळ रा.नायजेरिया देश यांच्या ताब्यात ''मेथाक्युलॉन'' हा अंमली पदार्थ विक्री करिता सोबत बाळगलेल्या स्थितीत असताना मिळून आले त्यांच्या ताब्यात एकुण ५,०००००/- किंमतीचे ५० ग्रॅम मेथाक्युलॉन हा अंमली पदार्थ तसेच रोख रक्कम, मोबाईल असा एकुण ५,०२,२००/-रु किंमतीचा माल मिळुन आला.

त्यांच्या विरुध्द तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ४६/२०२३ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २२(ब),२९ सह पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम १९५० चे कलम ३ व ६ सह परदेशि नागरीक कायदा कलम १४ (अ) (ब) (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास वपोनि बासीतअली सय्यद हे करित आहेत.